# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/12/2023 (मंगळवार) दुपार

---

## धान चोरीच्या गुन्हयातील आरोपी गजाआड
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

दिनांक ११/१२/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणचे पथक पो.स्टे. पोस्टे मौदा येथील अप. क्र. ११३८/२३ कलम ३७९ भादवी चे गुन्ह्यात आरोपी शोध कामी फिरत असता धान चोरीच्या गुन्हया मधील **आरोपी नामे– सुनील रिखीराम राय, वय ३४ वर्ष, रा. छीडीया पलारी ता.जी. शीवणी (mp)** याचा शोध घेत असता खुमारी टोल नाक्यावरून एक बोलेरो पीकअप वाहन भरधाव वेगाने निघाले संशय आल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर वाहनाचा पाठलाग केला असता, सदर वाहनात बोऱ्यात भरुन धान दिसुन आले. सदर बोलेरो पीकअप वाहन क्र. MH 29 BE 2185 चा चालक आरोपी नामे– **सुनील रिखीराम राय** यास विश्वासात घेवुन सखोल विचारपुस केली असता चौकशी मध्ये सदर धान आसोली शिवारातील शेतातून ११ पोते चोरी केल्याचे कबुली दिली. याबाबत पो.स्टे. मौदा सदर प्रकरणा बाबत विचारणा केली असता पो.स्टे. मौदाला अप. क्र. ११३८/२३ कलम ३७९ भादवी गुन्हा दाखल असल्याचे समजले सदर वाहन व आरोपी यास ताब्यात घेऊन सदर आरोपी यास जप्ती मुद्देमाल १) ११ धानाचे पोते किंमती ५०,०००/– रु २) बोलेरो पिकअप क्र. MH 29 BE 2185 किंमती ५,०००००/– रु. एकूण किंमती ५,५०,०००/– रु. मुद्देमालासह पुढील तपासकामी पो.स्टे. मौदा यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे, सहायक फौजदार ज्ञानेश्वर राउत, पोलीस हवालदार विनोद काळे, इक्बाल शेख, पोलीस नायक संजय बरोदीया, विरेंद्र नरड, चालक मुकेश शुक्ला यांचे पथकाने केली.

## जबरी चोरी

पो.स्टे. खापा :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा उमरी फाटा येथे दिनांक ११/१२/२०२३ चे १५.३० वा. ते १५.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– सागर चंद्रभान बाजनघाटे, वय २५ वर्षे, रा. सिरोंजी ता. सावनेर हा मोटारसायकल क्रमांक एम. एच.–४०/बि. झेड–९२३२ नी सावनेर वरुन खापा मार्गे बडेगांव रोडनी घरी जात असतांना दुपारी ०३/३० वा. सुमारास उमरी फाटयाचे समोर १०० मिटर अंतरावर दोन ईसमांनी फिर्यादीस हात दाखवुन थांबवुन अज्ञात ईसमांनी चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीचा वन प्लस नॉर्ड सीई–२ कंपनीचा मोबाईल फोन ज्यात जिओ कंपनीचे सिम कार्ड आणि बिएसएनएल कंपनीचे सिम कार्ड असलेला किंमती १०,०००/– रु. चा मोबाईल फोन व पॅकेट मधील १८७०/– रोख आणि आधार कार्ड असा एकुण ११,८७०/– किंमतीचा मुद्देमाल जबरीने हिसकावुन पळुन गेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३९२, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मिलींद गेडाम पोलीस स्टेशन खापा मो. नं. ९४०४८१७७१८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर